# भंडारा जिल्ह्यातील ६४ रेती घाटांची पर्यावरण विषयक लोकसुनावणीचे इतिवृत्त
## दि.२३/११/२०२२. वेळ दु. १२.०० वा.

जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, ता. व जि. भंडारा यांनी भंडारा जिल्हयातील एकूण ६४ रेतीघाट, वडेगाव (रिठी) (३.६ हेक्टर), मांडवी (३.५ हेक्टर), कोथुर्णा (१.६२ हेक्टर), जुनी टाकळी ( ४ हेक्टर), येनोळा (१.२५ हेक्टर), जुनोना ( ३ हेक्टर), भोजापूर ( ३ हेक्टर), गुडेगांव (४ हेक्टर), पवनी (३.९ हेक्टर), शिवनाळा ( ४ हेक्टर), वलनी ( ४ हेक्टर), खातखेडा ( ३ हेक्टर), विलम ( २ हेक्टर), ईटगांव (३.९ हेक्टर), कुर्झा (१.२ हेक्टर), चारगांव (३.९९ हेक्टर), बाम्हणी (३. ५ हेक्टर), सुकळी दे. (२ हेक्टर), लोभी ( १.१५ हेक्टर), तामसवाडी (४ हेक्टर), पांजरा रे. ( ४ हेक्टर), उमरवाडा (४ हेक्टर), मांडवी (४ हेक्टर), वारपिंडकेपार (३ हेक्टर), सोंडया (४ हेक्टर), चांदमारा ( ३ हेक्टर), अष्टि/आजन विहरी (१.५७ हेक्टर), सक्करदरा (धानोड) ( १.५ हेक्टर), बेटाळा दक्षिण ( ३.९१ हेक्टर), बेटाळा उत्तर ( ४.२१ हेक्टर), निलज बु. ( ४ हेक्टर), निलज खुर्द (३.९१ हेक्टर), ढिवरवाडा ( ४ हेक्टर), मुंढरी बु. (३.५ हेक्टर), कान्हाळगाव ( १.१ हेक्टर), देव्हाडा खुर्द ( १.४१ हेक्टर), टाकळी (२.२५ हेक्टर), पाचगांव क्र. १ ( १.२ हेक्टर), बोथली ( २.५ हेक्टर), मोहगावदेवी ( १.११३ हेक्टर), वटेटेकर ( १.१ हेक्टर), सालेबर्डी ( १.१ हेक्टर), सासरा (१.१ हेक्टर), खंडाळा ( १.१३८५ हेक्टर), परसोडी (मळेघाट) (१.३५ हेक्टर), परसोडी (आमराई) (१.१७ हेक्टर), परसोडी (पोवारटोला) (२ हेक्टर), पळसगाव ( १.९ हेक्टर), मिरेगाव ( १.६ हेक्टर), वाकल ( २.४७ हेक्टर), विहीरगांव ( १.२ हेक्टर), नरव्हा ( ३ हेक्टर), महेगाव ( २.४५ हेक्टर), आसोला ( १.१२५ हेक्टर), लाखांदूर (१.१ हेक्टर), मोहरणा ( ३.९ हेक्टर), नांदेड ( ३.७४ हेक्टर), गवराळा ( ४ हेक्टर), आंतरगांव /खा ( १.१ हेक्टर), विहीरगाव (१.१२ हेक्टर), भागडी (१.३२ हेक्टर), खैरणा (१.१५ हेक्टर), खोलमारा ( १.२ हेक्टर), दोनाड (३ हेक्टर), रेतीघाटाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक लोकसुनावणी घेण्याबाबत म.प्र.नि. मंडळाकडे अर्ज सादर केला होता.

भंडारा जिल्ह्यातील खनिकर्म विभागांतर्गत ६४ रेतीघाटांची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दि. २३.११.२०२२ रोजी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, जि. भंडरा येथे श्री. महेश पाटील अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, भंडारा यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्री.अशोक करे, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ नागपूर यांनी लोक सुनावणी समितीचे सदस्य व श्रीमती हेमा देशपांडे, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ भंडारा यांनी समन्वयक म्हणून कामकाज पाहिले. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या लोकांच्या नावांची यादी सोबत जोडत आहोत. **(सहपत्र-१)**.

भंडारा जिल्हा खनिकर्म विभागांतर्गत रेतीघाटासाठी पर्यावरण विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांची पर्यावरण विषयक अनुमतीसाठी जाहीर लोकसुनावणी आवश्यक असल्याने म.प्र.नि. मंडळाकडे दि.१८.१०.२०२२ रोजी पत्राव्दारे अर्ज सादर केला. मंडळाने दि.२५.१०.२०२२ च्या पत्रान्वये पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीची प्रक्रिया सुरू करण्याविषयी मंजुरी प्रदान केली. **(सहपत्र-२)**

पर्यावरण आघात मूल्यांकन अधिसूचना दि. १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित नियम दि. ०१.१२.२००९ च्या तरतुदीनुसार पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासनाचे पत्र दि. २०.१०.२०२२ जाहीर लोकसुनावणीचे स्थळ, दिनांक व वेळ मा. जिल्हाधिकारी, भंडारा यांची मंजुरीने निश्चित करण्यात आले. **(सहपत्र-३)**

म.प्र.नि. मंडळाचा आदेश क्र. ई-८१/२२ पत्र क्र. BO/JD/(WPC)/PH/B-२२१११०-FTS-००९१ dtd. १०/०१/२०२२ नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडत आहे. **(सहपत्र-४)**

...२...

भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसूचना क्र. **SO 60 (E) dtd. 27th Jan. 1994** व सुधारणा दिनांक १४ सप्टेंबर, २००६ मधील तरतुदीनुसार दिनांक २२/१०/२०२२ ला दैनिक हितवाद (इंग्रजी) व दैनिक देशोन्नती (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आल्या. दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या वृत्तपत्र कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र-५).**

प्रकल्प प्रवर्तकांनी म.प्र.नि. मंडळास जाहीर लोकसुनावणीकरिता सादर कलेले पर्यावरण व्यवस्थापन आराखडा व प्रस्तावित प्रकल्पाच्या कार्यकारी सारांशाच्या मराठी व इंग्रजी भाषेतील प्रती कार्यकारी सारांश खालील ठिकाणी जनतेच्या माहितीसाठी तसेच अभ्यासण्याकरिता ठेवण्यात आले होते.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा.
२. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरु पाईंट, तिसरा माळा, सायन माटुंगा, स्किम रोड नं. ८ सायन (पूर्व) मुंबई.
३. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मादाम कामा मार्ग, मंत्रालय मंबई.
४. प्रादेशिक कार्यालय म.प्र.नि. मंडळ, पाचवा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन, नागपूर.
५. प्रादेशिक कार्यालय (पश्चिम मध्य विभाग) पर्यावरण वन आणि हवामन बदल मंत्रालय तळमजला, पूर्व विभाग, नवीन सचिवालय इमारत सिव्हिल लाईन नागपूर.
६. जिल्हा खनिकर्म कार्यालय भंडारा.
७. जिल्हा परिषद भंडारा
८. जिल्ह्यातील संबंधित उप-विभागीय अधिकारी यांचे कार्याल.
९. जिल्ह्यातील संबंधित तहसीलदार यांचे कार्यालय.
१०. संबंधित ग्रामपंचायत कार्यालय.
११. तसेच मंडळाच्या www.mpcb.gov.in या संकेतस्थळ

**पर्यावरणीय जाहीर लोकसुनावणी घेण्याच्यावेळी एक निवेदन प्राप्त झाले आहे.**

लोकसुनावणीची प्रक्रिया १२.०० वाजता सुरू करण्यात आली. श्रीमती हेमा देशपांडे, समन्वयक उप-प्रादेशिक अधिकारी भंडारा यांनी मा. अध्यक्षांची परवानगी घेऊन लोकसुनावणीची प्रक्रिया सुरू केली. प्रास्ताविक भाषणादरम्यान त्यांनी जाहीर लोकसुनावणीच्या प्रक्रियेची पूर्ण माहिती दिली व सदर लोकसुनावणी समितीस पर्यावरण विषयक अनुमतीसाठी शिफारस करणे अथवा मंजुरी प्रदान करण्याचे अधिकार नसल्याचे सांगितले.

लोकसुनावणीचे इतिवृत, प्राप्त लेखी निवेदने व व्हिडीओ रेकार्डिंग पुढील कार्यवाहीसाठी मंत्रालयास सादर करण्यात येत असल्याचे त्यांनी भाषणादरम्यान सांगितले. सदर प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करण्यासाठी त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांच्या प्रतिनिधीस आमंत्रित केले.

प्रकल्प प्रवर्तक, जिल्हा खनिकर्म अधिकारी भंडरा श्री. रा. ल. गजभिये यांनी आपल्या प्रस्ताविकात सांगिले की, सन २०२२-२३ साठी भंडारा जिल्हायातील वाळूच्या घाटांचा लिलाव करण्याची योजना आखत आहेत कारण वाळू ही पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मुख्य सामग्री आहे. ईआयए अधिसूचना-२००६ नुसार खाण सुरू करण्यासाठी पूर्वी पर्यावरणीय मंजुरी आवश्यक आहे. म्हणून ईसीची प्रक्रिया म्हणून सार्वजनिक सुनावणी प्राथमिक टप्पा आहे.

...३...

मा. अध्यक्ष तथा अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी यांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबतच्या सादरीरणानंतर उपस्थितांना त्यांचे विचार, आक्षेप, निवेदन, तक्रार, टीका-टिप्पणी, अभिप्राय मांडण्यास सांगितले. आपले म्हणणे मांडतांना प्रत्येकाने स्व:ताचे नाव, हुद्दा तसेच गावाचे नावासहित सांगावे, असे प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ तथा सदस्य लोकसुनावणी समिती यांना सूचित केले.

कामकाजादरम्यान चर्चित मुद्दे खालीलप्रमाणे आहे.

कार्यवृत्त :

१. **श्री. नंदू रहांगडाले, पंचायत समिती तुमसर.**
   - प्रधामंत्री आवास योजनेअंतर्गत ज्यांना घरे मिळाली त्यांना वाळू लिलाव न झाल्यामुळे जास्त पैसे मोजून वाळू खरेदी करावी लागत आहे त्यामुळे गरीब माणूस जास्त पैसे मोजून वाळू खरेदी करुन शकत नाही त्यामुळे तो या योजनेपासून वंचित आहे.
   - वाळू लिलाव न झाल्यामुळे वाळूचे भाव खूप वाढलेले आहे. त्यामुळे लवकरात लवकर वाळू लिलाव झाला पाहिजे.
   - वाळू वाहतुकीमुळे रस्ते खराब झालेले आहे त्यांची दुरुस्ती झालेली नाही, पांदण रस्ते खराब झालेले आहे त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीमध्ये जाण्यास अडचण होत आहे. किती तरी शेतक-यांना शेती सुध्दा करणे अवघड झालेले आहे.
   - महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशच्या सीमेवरच्या नद्यांमधून अवैधपणे वाळू चोरी वाढली आहे, त्यामुळे शासनाचा महसूल बुडत आहे.
   - सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे उत्खनन केल्यास पर्यावरणा विपरित परिणाम होण्याची शक्यता नाही करिता सदर प्रस्ताव मंजूर होऊन रेतीघाटांचा लिलाव होणे आवश्यक आहे.

२. **श्री. परवेज पटेल, भंडारा.**
   - सध्या चोरीचे प्रकार खूप वाढलेले आहे. सर्व नियम घाटधारकांवर आहे. चोरी करणाऱ्यांवर कोणतेही बंधने नाहीत. अधिकाऱ्यांनी प्रयत्न करूनसुध्दा वाळूची चोरी वाढत असल्यामुळे घाटधारकांचे नुकसान होत आहे. माझी अशी विनंती आहे की, यावर कायमस्वरुपी उपाययोजना करावी व सदर प्रस्तावित रेतीघाटाच्या प्रकल्पास मंजुरी देऊन वाळूचा लिलाव लवकरात लवकर करुन वाळूची चोरी थांबवली पाहिजे व चोरी थांबली पाहिजे यासाठी शासनाने विचार करवा.

३. **श्रीमती. सीमा पडोळे पवनी, भोजापूर सरपंच**
   - आमच्या गावामध्ये प्रधामंत्री आवास योजनेअंतर्गत कामे चालू आहेत आणि वैयक्तिक कामेसुध्दा चालू आहे परंतु वाळू लिलाव न झाल्यामुळे वाळू मिळत नाही त्यामुळे लिलाव लवकरात लवकर झाला पाहिजे.
   - वाळू चोरीचे प्रमाण खूप वाढलेले आहे मध्यरात्री चोरीचे प्रमाण वाढलेले आहे त्यामुळे लोकांना त्रास होत आहे.
   - वाहतुकीमुळे रस्त्यांची तुटफूट होत आहे. चोरी करणाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात फायदा होत आहे. गरजू लोकांचे नुकसान होत आहे. ही चोरी थांबविण्यात यावी व वाळूचा लिलाव लवकरात लवकर करावा, घरकूलधारकांना वाळू उपलब्ध करून देण्यात यावी.

४. **श्री. प्रभाकर सावे, उप-सरपंच मांडवी**

- ज्या ठिकाणी वाळू घाट आहेत त्या ठिकाणी रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दूर्दशा झालेली आहे त्या ठिकणी रस्त्यांचे पक्के बांधकाम करण्यात यावे.
- वाळूची वाहतूक व उत्खनन हे सादरीकरणा दरम्यान सांगितलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजनेप्रमाणेच होईल, याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन प्रकल्पामुळे प्रदूषण नियंत्रणात राहील.

५. **श्री. अनिरुध्द ईश्वरकर कोथरुना**

- घाटधारकांना किती क्षेत्र उत्खननाकरिता दिले जाणार आहे.
- उत्खननाकरिता दिल्या जाणाऱ्या क्षेत्रामुळे नदीच्या पात्रावर तसेच आजूबाजूच्या परिसरावर विपरित परिणाम होणार नाही याची खात्री करावी.

६. **श्री. मयुर बिसेन, व्यापारी आघाडी बिजेपी भंडारा.**

- सध्या चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे, त्यामुळे पर्यावरणाची दूर्दशा होते आहे त्यामुळे लवकरात लवकर वाळू घाटाचे लिलाव व्हायला पाहिजे.

७. **श्री. प्रविण बोके ग्रामपंचायत जुनी टाकळी.**

- माझे एवढेच म्हणणे आहे की, वाळू वाहतुकीमुळे रस्त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. आमच्या गावाचे रस्ते पूर्णपणे खराब झालेले आहे, निवेदने पाठवूनसुध्दा रस्त्यांचे काम होत नाही.

**लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष तथा अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी श्री. महेश पाटील यांनी सदर लोकसुणावनी ही पर्यावरण विषयक लोकसुनावणी असल्याने पर्यावरणासंबंधी मुद्यांबाबत चर्चा करण्याचे आवाहन केले.**

**उपस्थित प्रकल्प प्रवर्तकांनी उपस्थित मुद्यांबाबत खालीलप्रमाणे खुलसा केला.**

- रेती वाहतुकीसाठी स्वतंत्र पक्का रस्ता देण्याबावत शासनाकडे प्रस्ताव पाठवुन मंजुरीनंतर कार्यवाही करण्यात येईल.
- शासनाकडून बांधकामाना वाळू उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करु.
- तहसीलदाराकडून जेवढ्या प्रमाणात प्रस्ताव आहे त्यापध्दतीने तेवढे क्षेत्र वाळू उत्खननासाठी दिले जाईल.
- संबंधित ग्रामपंचायतीला गौण खनिज निधी देण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. मंजुरी मिळाल्यास कार्यवाही करण्यात येईल.
- वाळू लिलाव झाल्यानंतर शासकीय घरकुलांकरिता व इतर कामांकरिता वाळू उपलब्ध केली जाईल
- जे गाव बाधित होणार आहे त्यांना बाधित क्षेत्रात घेऊन तेथील रस्त्यांची कामे केली जाणार आहे.
- ज्या ज्या गावातील रस्ते खराब झालेले आहे त्यांनी समिती गठीत करुन प्रस्ताव पाठवावे त्यांना प्राधान्य देऊन तेथील रस्त्यांची कामे खनिज विकास निधीमधून कामे केली जाईल.
- घरकुलधारकांना ५ ब्रास प्रमाणे वाळू मिळणार आहे
- पर्यावरण विषयक मंजूरी मिळाल्यानंतर एक रेती घाट शासकीय कामकाजासाठी आणि शासकीय योजनेअंतर्गत येणाऱ्या घरकुलांसाठी आरक्षित ठेवले जाणार आहे.
- जिल्हा प्रशासनातर्फे पोलिस विभामार्फत चेकपोस्ट लावून चोऱ्या थांबविण्याकरिता प्रयत्न केले जातील.

...५...

**अपर जिल्हाधिकारी, भंडारा**

यांनी सदर प्रकल्पाबाबत उपस्थित नागरिकांच्या प्रश्नांची व प्रकल्प प्रस्तावकांच्या उत्तराची उजळणी केली व सदर भंडारा जिल्ह्यातील ६४ रेती घाटांबाबत उपस्थित जन समुदायाने शांतपणे आपले निवेदने मांडली व योग्य ते मुद्दे उपस्थित केले व त्यांची नोंद घेण्यात आली आहे, असे सांगितले. लोकांचे व शासनाचे हिताची कामे होणे महत्वाचे आहे.

लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी अध्यक्षीय समारोप केला. समन्वयक श्रीमती हेमा देशपांडे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. तसेच प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनिधी यांनी सर्वांचे आभार मानले, माननीय अध्यक्ष यांचे परवानगीने ही जाहीर लोकसुनावणी संपली असे जाहीर केले

| | | |
|---|---|---|
| **(महेश पाटील)**<br>**अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, भंडारा व अध्यक्ष, लोक सुनावणी समिती** | **(अशोक करे)**<br>**प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर व सदस्य, लोक सुनावणी समिती** | **(हेमा देशपांडे)**<br>**उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, भंडारा व समन्वयक, लोक सुनावणी समिती** |